सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १७५ | बुधवार, दि. १८ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


















*अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत भूमी सुपोषण व संवर्धन राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ गुरुवारी श्री मंगळग्रह मंदिरात होत आहे. त्या अनुषंगाने श्री मंगळग्रह मंदिर परिसरातील तयारीची बोलकी छायाचित्रे. (सर्व छायाचित्रे : नीतेश बारी)*

# भूमी सुपोषण संवर्धन अभियानाचा उद्या शुभारंभ

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह अनेक महानुभाव उपस्थित राहणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने भूमी सुपोषण, संवर्धन या राष्ट्रीय अभियानाचा शुभारंभ गुरुवार, दि. १९ मार्च रोजी श्री मंगळग्रह मंदिर येथून होणार आहे. दुपारी २ वाजता आयोजीत या कार्यक्रमाला केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासह विविध महानुभाव तसेच अनेक सामाजिक, धार्मिक संस्थांसह संघटनांचे प्रतिनिधी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



देशातील शेतजमीन हळूहळू निकस व नापिक होत चालली आहे. अनेक ठिकाणी तर ती रासायनिक खते विषारी कीटकनाशकांचे बेसुमार वापरामुळे अत्यंत विषारीही झाली आहे. या गंभीर परिस्थितीला आळा घालण्यासाठी कृषी व पर्यावरण क्षेत्रातील विविध सामाजिक, धार्मिक संस्थांसह संघटनांनी एकत्रित सन २०२१पासून भूमी सुपोषण व संवर्धन या राष्ट्रव्यापी जनअभियानाची सुरूवात केली आहे. गेल्या पाच वर्षांत देशभरात सुमारे ३० हजार गावे व ५४ हजार शहरी ठिकाणी भूमिपूजन व प्रबोधन कार्यक्रम राबविले गेले आहेत. त्याच अनुषंगाने येथील श्री मंगळग्रह मंदिरात श्री भूमी मातेच्या जन्मदिनी अर्थातच चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजेच गुढीपाडव्याच्या मंगल मुहूर्तावर या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ होणार आहे. १९ मार्च २०२६ ते अक्षयतृतीया (१९ एप्रिल २०२६) या कालावधीत संपूर्ण देशभरात हे अभियान राबविले जाईल.

या अभियानात विविध सामाजिक, धार्मिक संस्था, हजारो गोशाळा, स्वयंसेवी संस्था, देशातील सर्व कृषी विद्यापीठे व कृषी विज्ञान केंद्रांना सहभागी करून घेतले जाणार आहे. अभियानांतर्गत भूमिपूजन, भूमी सुपोषण करणाऱ्या शेतकऱ्यांचा सन्मान, प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा, जनजागृती शिबिरे व प्रदर्शने आयोजीत केली जातील. तसेच शहरी भागात जैविक व अजैविक कचरा वेगळा ठेवणे, जैविक कचऱ्यापासून खत निर्मिती यासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून जनजागर केला जाणार आहे. या राष्ट्रव्यापी अभियानाच्या जनजागर शुभारंभप्रसंगी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून राष्ट्रप्रेम वृद्धिंगत करावे. तसेच कृषी क्षेत्रात क्रांती घडविण्यासाठी सक्रीय सहभागी व्हावे, असे आवाहन अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर यांनी केले आहे.

दरम्यान, अक्षय कृषी परिवार व मंगळग्रह सेवा संस्था, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, रोटरी क्लब, लायन्स क्लब, निरंकारी परिवार, विविध समाजसेवी संस्था व संघटना यांचे पदाधिकारी हे अभियान यशस्वितेसाठी परिश्रम घेत आहेत.

### या महानुभावांची लाभणार उपस्थिती

कन्हेरी आश्रमाचे प. पू. आदित्य काडसिद्धेश्वर महास्वामी, प. पू. संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थान, अमळनेरचे गादीपती प्रसाद महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे समिती सदस्य भागैयाजी, अक्षय कृषी परिवाराचे अध्यक्ष मनोजभाई सोलंकी, उपाध्यक्ष डॉ. गजानन डांगे, भूमी सुपोषण अभियानाचे राष्ट्रीय संयोजक पद्मश्री सुभाष शर्मा, नवलजी रघुवंशी (इंदूर), सहसंयोजक आलोकजी गुप्ता (दिल्ली), सचिव डॉ. बेरिंदम गुणाकरजी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचारक डॉ. दिनेशजी, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे महाराष्ट्र व छत्तीसगड मुख्य संयोजक सुनीलजी घनवट, महाराष्ट्राचे कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन, जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, जळगावच्या खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील यांच्यासह राजकीय व कृषी क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

### दिनविशेष
१८ मार्च

- जागतिक पुनर्वापर दिन
- ऑर्डनन्स फॅक्टरी स्थापना
- असहकार आंदोलनासाठी महात्मा गांधींना ६ वर्षांचा तुरुंगवास.
- नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने भारतातून कूच करून भारताच्या पश्चिम सीमेवर ब्रिटिशांचा पराभव करून तिरंगा फडकावला.

### गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# गुढीपाडवा नेमका कधी १८ की १९ मार्च?

## जाणून घ्या पाडव्याची नेमकी तारीख व गुढी उभारण्याचा शुभ मुहूर्त!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गुढीपाडव्याला हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाचा सण मानले जाते. गुढीपाडवा हा साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मानला जातो. यादिवशी कोणत्याही प्रकारचे शुभ कार्य केले जाते. नवीन वस्तू आवर्जून गुढीपाडव्याच्या दिवशी खरेदी केल्या जातात. गृहप्रवेश किंवा वास्तुशांती सारखे शुभ कार्य या दिवशी करतात. गुढीपाडव्याला दारात सडा रांगोळी टाकून छान फुलांचे तोरण दाराला लावून गुढी उभारली जाते. या सणाचे धार्मिक,पौराणिक आणि ऐतिहासिक महत्व देखील मानले जाते. त्यामुळे यंदा गुढीपाडवा केव्हा आहे याबाबत लोकांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. गुढीपाडव्याच्या नेमक्या तारखेबद्दल कन्फ्युजन असल्याने गुढी केव्हा व कोणत्या मुहूर्तावर उभारायची जाणून घेऊया.

### गुढीपाडव्याची तारीख

गुढीपाडव्याचा सण हा चैत्र शुक्ल प्रतिपदेच्या शुभ मुहूर्तावर हिंदू पंचांगानुसार साजरा करण्यात येतो. यंदा प्रतिपदा तिथी ही खालीलप्रमाणे असणार आहे.

चैत्र प्रतिपदा तिथी

**प्रारंभ :** गुरुवार, १९ मार्च- सकाळी ६ वाजून ५५ मिनिटांनी.

चैत्र प्रतिपदा तिथी

**समाप्ती :** शुक्रवार, २० मार्च- पहाटे ४ वाजून ५० मिनिटांनी.

**उदय तिथीनुसार गुढीपाडवा :** गुरुवार, १९ मार्च रोजी साजरा करण्यात येईल.

### गुढीपाडव्याचा शुभ मुहूर्त

**सूर्योदय :** गुरुवार, १९ मार्च - सकाळी ६ वाजून २६ मिनिटांनी.

**अभिजित मुहूर्त :** गुरुवार, १९ मार्च - दुपारी १२ वाजून ४ मिनिटांपासून ते दुपारी १२ वाजून ५३ मिनिटांपर्यंत.

### गुढीपाडवा पूजा कशी कराल?

गुढीपाडव्याची पूजा करताना सर्वप्रथम एक लाकडी काठी घ्यावी. काठीला पाण्याने स्वच्छ करावे. मग तिला हळदी-कुंकू लावून साडी नेसवावी. गुढीला साडी नेसवताना ती नवीन असावी किंवा तुम्ही ब्लाऊजपीस देखील लावू शकता. साडी नेसवल्यानंतर एक तांब्या गुढीवर ठेवावा त्याला देखील हळदी-कुंकू लावावे. मग तांब्याला कडुनिंबाचा पाला, घाटी घालावी. ही गुढी आपल्या दारावर उभारावी. गुढीच्या पायाशी रांगोळी काढावी. धूप, दीप, अगरबत्ती लावून गुढीची विधिवत पूजा करावी. गुढीला हार फुले वहावीत व शेवटी गोडाचा नैवेद्य दाखवावा. सायंकाळी सूर्यास्ताच्या आत गुढीला दही भाताचा नैवेद्य दाखवून ती उतरवावी.



### शुभ मुहूर्ताला महत्त्व का?

ग्रहतारे दररोज आपली जागा बदलून काही खास योग आणि शुभ संयोग बनवितात. ज्योतिषशास्त्रानुसार ग्रहांच्या विशिष्ट स्थितीत जे शुभ योग बनतात त्यावेळेला शुभ मुहूर्त म्हणतात. या मुहूर्तावर केलेले कोणतेही काम व्यक्तीला यश मिळवून देते, असे म्हणतात. शुभ मुहूर्तावर खरेदी केलेल्या वस्तू फलदायी ठरतात. कोणत्याही नवीन कामाची सुरूवात शुभ मुहूर्तावर केल्यास त्या कामात यश मिळते व लाभ होतो. तसेच गृहप्रवेश, मंगलकार्यही शुभ मुहूर्तावर करतात. ज्यामुळे आपल्या आयुष्याची सुरूवात मंगलमय होऊन आयुष्यात सुख, समृद्धी व आनंद कायम असावा. त्यामुळे हिंदू धर्मात शुभ मुहूर्तावर सर्व धार्मिक व मंगलकार्ये पार पडतात.

### गुढी कशी व केव्हा उतरवावी?

गुढीपाडव्याला सकाळी सूर्योदयानंतर गुढी दारात उभारली जाते. गुढीपाडवा हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने धार्मिकदृष्ट्या हा दिवस अतिशय महत्त्वपूर्ण मानला जातो. गुढी जशी शुभ मुहूर्तावर उभारली जाते तसेच ती सायंकाळी शुभ मुहूर्तावर विधीवत उतरवली जाते. गुढीपाडवा यंदा गुरुवार, १९ मार्च रोजी साजरा करण्यात येईल. या दिवशी दारात छान सजवलेली गुढी उभारली जाते. गुढी ही विजयाचे व मांगल्याचे प्रतीक मानले जाते. गुढीला भरजरी नेसवतात. साखरेची माळ, कडुनिंबाचा पाला, पुष्पहार गुढीला घातला जातो व तिची विधिवत पूजा करून शुभ मुहूर्तावर गुढी दारात उभारली जाते. त्याचप्रमाणे गुढी उतरवताना देखील एक विशिष्ट पद्धत अवलंबायची असते. गुढी उतरवताना सुद्धा ती शुभ मुहूर्तावर खाली घेतली जाते. यावेळी गुढीला नैवेद्य दाखविला जातो.

### गुढी उतरविण्याची नेमकी वेळ

गुढीला उतरवितानाही शुभ मुहूर्त पाहिला जातो. गुढी नेहमी सूर्यास्ताच्या आत उतरवायची असते. त्यामुळे यंदा गुरुवार, १९ मार्च रोजी सूर्यास्ताची वेळ सायंकाळी ६ वाजून ५० मिनिटांचा असल्याने तुम्ही यावेळेत गुढी खाली उतरवू शकता.

### गुढी उतरविण्याचा विधी

गुढी उभारताना विशिष्ट पूजा केली जाते त्याचप्रमाणे गुढी उतरवितानाही विधीवत उतरविली जाते. गुढी सूर्यास्ताच्या आत उतरवावी. सायंकाळी ती उतरविताना सर्वांत प्रथम गुढीला हळदी-कुंकू वहावे. हार, फूल अर्पण करावे. गुढीला साखरेचा किंवा कोणताही गोड नैवेद्य दाखवावा. धूप-दीप अगरबत्ती लावून आरती करावी. त्यानंतर नमस्कार करून गुढीला सावकाश खाली उतरवावे.

## संपादकीय

# ‘एआय’साठी ऐंशी हजार तंत्रज्ञ आहेत?

जगाच्या इतिहासात काळाबरोबर अनेक बदल घडत गेले. शंभर वर्षांपूर्वी औद्योगिक क्रांती घडून आली. विज्ञानाच्या वेगवान संशोधनातून अनेक नवनव्या उद्योगांची सुरूवात झाली. त्यानंतरच्या पन्नास वर्षांत तर उद्योगांच्या भरभराटीचा काळ सुरू झाला. उद्योगांमधून अनेक नवनवीन सुखसाधनांची निर्मिती झाली आणि रोजगाराचे आश्वासक दालनही खुले झाले होते. जगभर या औद्योगिक क्रांतीने एक वेगळेच आकर्षण निर्माण केले आणि मग भारतातही स्वातंत्र्य मिळाल्या-मिळाल्या देशासाठी औद्योगीकरण हे अतिशय आवश्यक आहे, असे मानून तशी धोरणेही तयार केली गेली. त्यानंतर चाळीस वर्षांपूर्वी माहिती-तंत्रज्ञानाचे युग आले आणि सगळे जग एक मोठी बाजारपेठही ठरले. माहितीच्या देवाणघेवाणीतून विकासाचे नवे पर्व सुरू झाले. जगातील कुठल्याही देशात आणि कुठल्याही भागातून लोकांना एकमेकांशी संपर्क करणे सहज शक्य झाले. उद्योग-व्यवसायासाठी तर हे माहिती तंत्रज्ञान खूप मोठे वरदान ठरले. भारतातसुद्धा आज शंभर कोटींपेक्षा जास्त लोकांकडे मोबाईल आहेत. ८० कोटी लोक नियमित इंटरनेटचा वापर करतात. त्यातूनच डिजिटल व्यवहारांचे युग सुरू झाले. ऑनलाईन बँकिंग किंवा सरकारी कामकाजामध्येही या इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ई-गव्हर्नन्स राबविले जाऊ लागले. या माहिती तंत्रज्ञानाने वेळेची, पैशाची आणि शक्तीचीही बचत केली. अनेक कामे घरबसल्या किंवा आहे त्याच ठिकाणाहून करता येणे शक्य झाले. कोरोनासारख्या महामारीत याच माहिती तंत्रज्ञानामुळे वर्क फ्रॉम होमचेही नवे पर्व अस्तित्वात आले. औद्योगिक क्रांती माहिती तंत्रज्ञानाचे युग ही दोन मोठी स्थित्यंतरे जगात घडली. अर्थातच या क्षेत्रातील तज्ज्ञांचे संशोधन थांबलेले नव्हते. या माहिती तंत्रज्ञानामुळे अधिक नवनवीन संशोधनांनाही प्रोत्साहन मिळाले. त्यातूनच आता कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान संपूर्ण जगासाठी एक अभूतपूर्व क्रांती घडवून आणणारे ठरणार आहे.

सध्या एआय तंत्रज्ञान म्हणून सर्वदूर चर्चेत असलेल्या या नव्या क्रांतीपर्वासाठी भारतालाही सज्ज व्हावे लागते आहे. किंबहुना भारताने एआय तंत्रज्ञानाचा प्रभाव लक्षात घेऊनच सुरूवातीलाच मोठी पावले उचलायला सुरूवात केली आहे. गेल्या महिन्यात दिल्लीत पार पडलेली एआय जागतिक परिषदेने भारताकडे एआयबाबत पुरेशी क्षमता असल्याचे सिद्ध केले. औद्योगिक क्रांती किंवा माहिती तंत्रज्ञानाचे युग जगभर सुरू झाले होते. पण ते भारतात पोहोचायला २० ते २५ वर्षे उशीर झाला. एआय तंत्रज्ञानाच्या बाबतीत भारत मागे राहू नये. केवळ जगाच्या बरोबरीनेच नव्हे, तर एआय तंत्रज्ञान राबविण्याबाबतची कार्यक्षमता सिद्ध करून पुढाकार घेण्याच्या दृष्टीने पावले टाकलेली दिसतात. एआय तंत्रज्ञानासाठी तंत्रज्ञ व संशोधक तयार व्हावा म्हणून देशभरातील सगळ्याच विद्यापीठे, महाविद्यालये, शाळांमधून एआय तंत्रज्ञानाचा अभ्यासक्रम सुरू झाला आहे. केवळ विद्यापीठ स्तरावरच नव्हे, तर शालेय स्तरावरसुद्धा पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी आतापासूनच एआय तंत्रज्ञानाचा अभ्यास सुरू केला जात आहे. महाराष्ट्र सरकारने अलीकडेच निर्णय घेऊन राज्यातील ८० हजार सरकारी शाळांमध्ये एआय तंत्रज्ञानासाठी आवश्यक अशा वर्गखोल्यांची उभारणी करण्याचा निर्णय घेतला. प्राथमिक तयारीसाठी ४२ कोटींची तरतूदही केलेली आहे. सरकारचा हा निर्णय म्हणजे येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची शालेय स्तरावरील पूर्वतयारी ठरते. परंतु अनेकवेळा सरकारी निर्णय हे उत्साहाच्या भरात घेतले जातात. त्याची तेवढ्या प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही.

अगदी माहिती तंत्रज्ञानाच्या बाबतीतही हाच प्रकार घडला. शाळांमधून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने शिक्षण देण्याची सुरूवात करण्याच्या घोषणा झाल्या होत्या. मग अगदी वर्गांमधील फळे देखील इलेक्ट्रॉनिक्स स्क्रीनसारखे करण्याचे ठरले होते. पण तसे होऊ शकलेले नाही. तसा प्रकार या शाळांमधील एआय तंत्रज्ञानाबाबत होऊ शकलेले नाही. येणाऱ्या प्रभावी तंत्रज्ञानाचा किंबहुना या एआय क्रांतीचा खूप गांभीर्याने विचार करणे क्रमप्राप्त ठरते. त्यादृष्टीने अशा प्रकारच्या उपाययोजना गरजेच्याही ठरतात. परंतु सरकारी शाळांची सध्याची अवस्था लक्षात घेतल्यास मोठा विरोधाभास पाहावयास मिळतो. सरकारी शाळांपर्यंत उत्तर इंटरनेट सेवा उपलब्ध होणे आणि शाळांची तितक्याच उत्तर रीतीने देखभाल होणे गरजेचे आहे. यातील महत्त्वाचा मुद्दा असा, की ८० हजार एआय तंत्रज्ञान निगडीत वर्ग खोल्यांचे बांधकाम करणे प्रत्यक्षात येईलही. परंतु आज ८० हजार एआय तंत्रज्ञ शिक्षक किंवा प्रशिक्षक उपलब्ध आहेत का, याचाही विचार क्रमप्राप्त ठरतो. जरी हा प्रयोग एका खासगी संस्थेच्या मदतीने प्रत्यक्षात येत असला तरी त्यांच्याकडेही एआय प्रशिक्षित इतके मनुष्यबळ आहे की नाही हे पाहिले जाणे गरजेचे आहे. आज जगभरात याच प्रशिक्षित मनुष्यबळाचा तुटवडा आहे. महाराष्ट्रातही तीच परिस्थिती आहे. अन्यथा एआय तंत्रज्ञानाचा विचार करून वर्ग खोल्या उभारल्याही जातील. मात्र यासंदर्भातील शिक्षण देण्यासाठी तितक्याच तज्ज्ञांचीही आवश्यकता भासेल.

# फडणवीसांचा फोन आला, अन् चक्कर येऊन पडायचेच बाकी राहिले...!

## राज्यसभा खासदारांचा किस्सा; आर. आर. आबांनी हेरले...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



राज्यसभेवर महाराष्ट्रातून जाणाऱ्या खासदारांची नुकतीच बिनविरोध निवडणूक झाली. त्यात भाजपचे रामदास आठवले, विनोद तावडे, माया चिंतामण इवनाते व रामराव वडकुते हे निवडून आले आहेत. तसेच शरद पवार, ज्योती वाघमारे, पार्थ पवार हे अन्य पक्षातर्फे निवडून आले आहेत. एक, दोन वगळता इतर सर्व नावे महाराष्ट्रास परिचित आहेत. मात्र, त्यातही एक नाव धक्कादायी ठरले. हे कोण ?

**(स्व.) आर. आर. आबा यांनी हेरले...**

भाजपने उमेदवारी दिलेले व आता राज्यसभेचे खासदार झालेले रामराव वडकुते हे ते नाव. मूळचे राष्ट्रवादी काँग्रेसचे. घरची बेताची स्थिती. एमएससी झाल्यावर पुढे काय? असा प्रश्न असतांनाच सरकारी नोकरी पत्करली. एका घटनेने कलाटणी दिली. तत्कालीन औरंगाबाद येथे अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यासाठी मोर्चा निघाला होता. त्याचे नेतृत्व करणाऱ्या रामराव वडकुते यांना राष्ट्रवादीचे मंत्री (स्व.) आर. आर. आबा पाटील यांनी हेरले. थेट शरद पवार यांची भेट करून दिली.

**राज्यमंत्री दर्जा**

शरद पवार यांनी मग रामराव यांना शेळी मेंढी विकास मंडळाचे अध्यक्षपद देत राज्यमंत्री पदाचा दर्जा असलेले पद बहाल केले. ते परभणी येथील. मात्र, त्यांना हिंगोली येथून लढण्याचा आदेश झाला. त्यात ते पराभूत झाले. मात्र, परत त्यांना याच मंडळचे अध्यक्षपद देवू करण्यात आले. कार्यकर्त्यांनी आग्रह करूनही त्यांनी ते पद नाकारले. विधान परिषदेची उमेदवारी मिळाली. आमदार झाले. मात्र, एक वर्षाची मुदत शिल्लक असतांनाच रामराव यांनी राजीनामा देत २०१९मध्ये भाजपमध्ये प्रवेश घेतला.

**सात वर्ष विजनवास**

काही हमी घेत वडकुते हे भाजपमध्ये आले. मात्र प्रतीक्षा संपत नव्हती. ७ वर्ष संघर्षात गेली. ते राजकीयदृष्टया आता संपले असे बोलले जावू लागले. मात्र, पदाशिवाय त्यांचे कार्य सुरूच होते. विधानपरिषदवर त्यांची वर्णी लागणार, अशी चर्चा होती. मात्र, यादीतून त्यांचे नाव शेवटी कट झाले. आता राजकीय भविष्य काय? अशी चिंता त्यांचे समर्थक व्यक्त करू लागले. अखेर तो दिवस उगवलाच.

**मुख्यमंत्री फडणवीसांचा फोन**

मात्र, त्यांच्यावर भाजप नेतृत्व लक्ष ठेवून होतेच. राज्यसभेच्या निवडणुकीच्या सात दिवसापूर्वी मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांचा रामराव वडकुते यांना फोन आला. कागदपत्रे तयार ठेवा आणि रामराव आश्चर्यत पडले. कारण ध्यानीमनी नसतांना थेट राज्यसभा मिळणार. हा किस्सा खुद्द रामराव यांनी सांगितला. मुंबईस्थित वर्धेकर पत्रकार विनोद राऊत यांनी खासदार झाल्यानंतर त्यांचा मुंबईत पत्रकार संघातर्फे सत्कार घडवून आणला. यावेळी बोलताना रामराव म्हणाले की फडणवीस यांचा फोन आला आणि चक्कर यायचेच बाकी राहले.

**वर्धेशी घट्ट नाते**

आता खासदार झालेल्या रामराव वडकुते यांचे वर्धेशी घट्ट नाते राहले आहे. येथील माजी जि. प. सदस्य प्रमोद राऊत यांचा त्यांच्याशी १५ वर्षांपासूनचा घरोबा. रामराव हे आमदार असताना वर्ध्यात अनेकवेळा येऊन गेले आहेत. येथील काही जि. प. प्रभागात विकासकामांसाठी त्यांनी आमदारनिधीही दिला. नागपूरला अधिवेशन असले की ते हमखास राऊत यांच्याकडे येत होते. म्हणूनच अनेकांशी खासदार वडकुते यांचा स्नेह जुळलेला. म्हणूनच मुंबईत झालेल्या त्यांच्या सत्कारास येथील काहींनी हजेरी लावली होती. त्यांनीच वडकुते कसे भावविवश झाले होते, याबद्दल माहिती दिली. त्यांचा वर्ध्यात नागरी सत्कार घेणार असल्याचे राऊत यांनी सांगितले.

# सिंहगडावर इंग्रजांनी जप्त केलेल्या सोन्याच्या पेटाऱ्यांचे आजही गूढ का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**सिंहगड किल्ला**

२ मार्च १८१८ रोजी सिंहगड किल्ल्याचा पाडाव झाला आणि मराठ्यांना किल्ला सोडावा लागला.

**वैयक्तिक सामान**

तेव्हाच्या अटींनुसार किल्ल्यातील लोकांना केवळ आपले वैयक्तिक सामान नेण्याची मुभा देण्यात आली होती.

**नारो गोविंद औटी**

नारो गोविंद औटी नावाचे बाजीरावांचे एक विश्वासू व्यक्ती किल्ल्यात होते. त्यांच्या सामानामध्ये चार सोन्याने भरलेली पेटारे होती.

**३६ लाखांची मालमत्ता**

नारो गोविंद यांच्या दाव्यानुसार पेटाऱ्यांमध्ये सुमारे ३६ लाखाची मालमत्ता होती. त्यांची ती खाजगीतली होती.

**कोर्टाची पायरी**

मात्र, इंग्रजांना विश्वास बसला नाही आणि ते सगळे सोने त्यांनी जप्त केले. पण नारो गोविंद शांत बसले नाहीत, त्यांनी कोर्टाची पायरी चढली.

**सुप्रीम कोर्ट**

तेव्हाच्या मुंबई सुप्रीम कोर्टाचा निर्णय नारो गोविंद यांच्या बाजूने लागला. मात्र, या **निर्णयाविरुद्ध कंपनी**

सरकारने थेट लंडनला प्रिव्ही कौन्सिलमध्ये अपिल दाखल केले

**इंग्रज**

इंग्रजांना शंका होती की मालमत्ता बाजीरावांची असली पाहिजे, कारण तसे असले तर त्या सोन्यावर विजेते म्हणून त्यांचा अधिकार होता.

**इंग्रजी लिखाण**

या नारो गोविंदांचा सर्व इंग्रजी लिखाणामध्ये केलेला उल्लेख नरोबा गोविंद औटिया असा आहे.

**डेक्कन प्राईझ मनी**

या अपीलाचा निर्णय लागेपर्यंत डेक्कन प्राईझ मनीचे वाटप केले जाऊ नये, अशी मागणी पार्लमेंटमध्ये करण्यात आली आणि त्यानुसार वाटप थांबवून ठेवण्यात आले.

**१८३० साल**

प्रिव्ही कौन्सिलचा हा निर्णय कंपनीच्या अपिलाच्या बाजूने लागला, पण तोपर्यंत १८३० साल उजाडले होते.

**मारवाडी**

मध्यंतरीच्या काळात नारो गोविंद यांचा मृत्यू झाला पण त्यांच्या वतीने दोघा मारवाडी व्यक्तींनी दावा पुढे चालू ठेवला.


**सोन्याचे गूढ**

हा दावा त्यांनी रोख पैसे देऊन बहुधा नारो गोविंदाच्या पुढच्या पिढ्यांपासून विकत घेतला असला पाहिजे, असे सांगितले जाते.. हा निर्णय आजही वाचायला उपलब्ध आहे. मात्र, या सोन्याचे गूढ उकलेले नाही.

# कॅन्सरमुळे वडिलांचे झाले होते निधन, अक्षय कुमार भावुक...!

## म्हणाला..'पन्नाशीनंतर पुरुषांनो ‘ही’ टेस्ट कराच'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अक्षय कुमारने एका कार्यक्रमात पुरुष वर्गामध्ये कॅन्सरबाबत जनजागृती केली आहे. बॉलिवूड अभिनेता अक्षयकुमार आपल्या चित्रपटातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत असतो. काही चित्रपटातून तो समाजाला संदेश देण्याचाही प्रयत्न करतो. केवळ चित्रपट नाही तर, जाहिरातींमधूनही तो प्रेक्षकांमध्ये आरोग्याच्या निगडीत जनजागृती पसरवत असतो. थिएटरमध्ये शो सुरु होण्यापूर्वी अक्षय कुमारची नो स्मोकिंग अँड आपण सर्वांनीच पाहिली असेल. दरम्यान, अलिकडेच अक्षय कुमारने एका इव्हेंटमध्ये पुरुषांमध्ये कॅन्सरबाबत जनजागृती केली आहे. अभिनेत्यानं पुरुषांना प्रोस्टेट कर्करोगाबाबत माहिती दिली. तसेच सुरुवातीची लक्षणे ओळखण्यास मदत करण्यासाठी नियमित पीएसए (प्रोस्टेट स्पेसिफिक अँटिजन) टेस्ट करण्याची माहितीही त्याने दिली. अक्षय कुमार झाला भावुक अक्षय कुमार अलिकडेच इंडिया टुडेच्या एका कार्यक्रमात सहभागी झाला होता. त्यावेळी सेशनच्या एका मॉडरेटरने सांगितले, की तो प्रोस्टेट कॅन्सर या आजारातून बरा झाला. यावेळी त्याने वडिलांबाबत माहिती दिली. वडिलांबाबत माहिती देताना अक्षय कुमार भावुक झाला होता. अक्षय कुमार म्हणाला की, त्याला असे वाटते की त्याच्या वडिलांना गमावण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे, त्याला ५०-५५ वयानंतर प्रोस्टेट स्पेसिफिक एंटिजन टेस्टचे महत्त्व माहित नव्हते. जे प्रोस्टेट कर्करोगाचे निदान करण्यास मदत करते. अक्षय कुमार यावेळेस इमोशनल झाला आणि म्हणाला, ‘मी माझ्या आयुष्यातील सर्वात महत्त्वाची व्यक्ती, माझ्या वडिलांना गमावले आहे. ६७ व्या वर्षी ते आम्हाला सोडून गेले. माझे वडील माझ्यासाठी सर्वस्व होते. कारण मला ठाऊक नव्हते की, ५०-५५ वयात पीएसए टेस्ट करायला हवे', असे त्याने म्हटले. ‘मी उपस्थित सर्वांना एक गोष्ट सांगू इच्छित आहे की, पुरुषांनी दरवर्षी पीएसए टेस्ट करणे खूप गरजेचे आहे, हे आम्हाला आधी ठाऊक नव्हते. जर लवकर निदान झाले तर, आमचा जीव वाचू शकतो'. ‘प्रोस्टेट कर्करोग खूप सामान्य आहे. तीनपैकी एका पुरुषाला प्रोस्टेट कॅन्सर होण्याचा धोका असतो. त्यामुळे कृपया टेस्ट करा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे केवळ स्वतःचे जीवन नाही तर, संपूर्ण कुटुंबाचे जीवन वाचवू शकता', असे अक्षय कुमार म्हणाला. मिळालेल्या माहितीनुसार, अक्षय कुमारचे वडील हरी ओम भाटिया यांना २०००मध्ये प्रोस्टेट कर्करोगाचे निदान झाले होते.

# तीक्ष्ण डोळे, चपळ दृष्टीचा सुतारपक्षी

**पक्ष्यांची ओळख**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



**नाव :** सुतारपक्षी Woodpecker

**रंग :** पाठ पिवळी तर डोक्यावर लाल तुरा, पोटाकडे जाणारे पांढरे पट्टे.

**चोच :** काळी, टणक मजबूत, छिन्नी सारखी. कठोर चोचीने हा पक्षी घर बांण्यासाठी खाडाला छिद्र पाडतो.

**डोळे :** रखाडी लहान व तीक्ष्ण. दृष्टी चपळ.

**घरटे :** टणक चोचीने सुतार पक्षी झाडाच्या खोडावर गोल छिद्र करून घर तयार करतो. चोच आपटून घरटे तयार करणे हे या पक्षाचे वैशिष्ट्य आहे.

**अंडी :** मादी एप्रील मे महिन्यात दोन तीन अंडी घालते. त्यांचा रंग पांढरा असतो.

**भक्ष :** सुतार पक्षी खोडातील वाळवी. किटक,मुंग्या,अळ्या आणि फुलातील रस खातो.

**आवाज :** किलबिलाट करणारा आवाज, पण झाडावर चोच मारतांना टुक टुक टुक आवाज ऐकू येतो

**इतर वैशिष्ट्ये :** प्रहार करणारी चोच हे प्रमुख वैशिष्ट्य होय. प्रहार करतांना सुतार पक्षी एकमेकांशी बोलतात. वेगाने जीवजंतू खात असल्यामुळे पर्यावरण समतोल राखण्यास मानवाला मदत करतो.

**संग्राहक :**
**प्रा. प्रकाश धर्माधिकारी**
**निसर्ग मित्र मंडळ, अमळनेर.**

# अमळनेरात उद्या भव्य हिंदू संमेलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : हिंदू धर्म, संस्कृती आणि समाजाचे संरक्षण व बळकटीकरण करण्याच्या उद्देशाने अमळनेर येथे भव्य हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, दि. १९ मार्च रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत पैलाड भागातील शिवाजी नगर येथे भवानी माता मंदिरात हे संमेलन होणार आहे.

मंगळग्रह सेवा संस्थेचे सचिव सुरेश बाविस्कर अध्यक्षस्थानी असतील. संतश्री. प्रसाद महाराज, श्री. श्री. महामंडलेश्वर महंत १००८ श्री. ईश्वरदासजी महाराज (श्रीक्षेत्र नंदगांव, ता. अमळनेर) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. श्रीकांत सुभाष पाठक (प्रांत सहसंयोजक, शिवशंभू विचार मंच) मार्गदर्शन करतील. संमेलनाच्या निमित्ताने सायंकाळी ६ वाजता मशाल यात्रेचेही आयोजन करण्यात आले आहे. ‘हिंदू सारा एक मंत्र हा दाही दिशांना घुमू द्या’ या घोषवाक्याखाली होणाऱ्या या संमेलनात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हिंदू संमेलन आयोजन समितीने केले आहे.

# पवित्र पोर्टलशिवाय शिक्षक झालेल्यांची खैर नाही...!

## शालेय शिक्षण मंत्री ना. भुसे यांचा कठोर इशारा, ‘पवित्र’ची लवकरच ‘एसओपी’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



पवित्र संगणक प्रणाली बंद असल्याचा गैरफायदा घेत काही शिक्षण संस्थांनी शिक्षकांची रिक्त पदे त्यांच्या स्तरावर भरली आहेत. मात्र, पोर्टलशिवाय करण्यात आलेल्या शिक्षक नियुक्त्या शासन धोरणाशी विसंगत असल्याने त्यांना मान्यता देण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे यांनी शुक्रवार, दि. १३ मार्च रोजी विधानसभेतील तारांकीत प्रश्नाच्या लेखी उत्तरात स्पष्ट केले. पवित्र पोर्टल प्रणाली बंद होती. त्या काळातील शिक्षक नियुयांना मान्यता द्यावी, असे उच्च न्यायालयाने आदेश दिले होते. मात्र, त्याला शासनाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल केल्यावर अंतरीम स्थगिती दिलेली आहे. पवित्र पोर्टल कार्यन्वीत झाल्यानंतरच्या काळात पोर्टलशिवाय शिक्षक नियक्त्यांची तपासणी करण्यासाठी शिक्षण उपसंचालकांच्या अध्यक्षतेखाली विभागनिहाय समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

राज्यात पवित्र पोर्टल पोर्टल डावलून अनेक शिक्षण संस्थांनी केलेल्या शिक्षक भरतीचे शासन काय करणार, असा ठाकरे शिवसेनेचे दिंडोशीचे आमदार सुनील प्रभू यांनी शुक्रवारी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. अनेक शिक्षण संस्थांनी पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती करण्याऐवजी जुन्या मान्यता दाखवून शिक्षक भरती केल्याचे मध्यंतरी प्रकरण उघडकीस आले होते. त्यासंदर्भात विशेष चौकशी पथक या प्रकरणाचा तपास करत आहे. अनेक शिक्षण संस्थाचालक आणि त्यामधील कर्मचारी व शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्यावर याप्रकरणी गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. शिक्षक भरती मधील संस्थाचालकांची मनमानी मोडून काढण्यासाठी फडणवीस सरकारच्या पहिल्या कार्यकाळात तत्कालीन शिक्षण मंत्री ना. विनोद तावडे यांनी पवित्र पोर्टल आणले होते. मात्र, संस्थाचालक आणि शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी यांनी संगनमताने पोर्टलला डावलून शिक्षक भरती करण्याचे प्रयत्न चालूच ठेवलेले आहेत. पवित्र पोर्टल शिवाय करण्यात आलेल्या शिक्षक भरतीला मान्यता दिली जाणार नाही. अशी भरती शासनाच्या धोरणाशी सुसंगत नाही, असे विधानसभेत लेखी उत्तरामध्ये शालेय शिक्षण मंत्री ना. दादा भुसे यांनी स्पष्ट केले आहे.

**एक मानक कार्यपद्धती करावी**

शिक्षक भरती पवित्र पोर्टलमार्फत करण्यासाठी एक मानक कार्यपद्धती (एसओपी) करण्यात यावी, असे विभागाला आदेश दिलेले आहेत. त्यामुळे पवित्र पोर्टल शिवाय करण्यात आलेल्या शिक्षक नियुक्त्या या शासन धोरणाशी विसंगत असून त्यांना मान्यता दिली जाणार नाही, असे मंत्री भुसे यांनी उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षमतेचे प्रतीक

## आयुध निर्माणी दिन विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संरक्षण व्यवस्थेत आयुध निर्माणींचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक असणारी शस्त्रे, दारुगोळा आणि लष्करी साहित्य तयार करणाऱ्या या कारखान्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी दरवर्षी १८ मार्च रोजी आयुध निर्माण दिन साजरा केला जातो. हा दिवस भारताच्या स्वदेशी संरक्षण उत्पादन क्षमतेचे प्रतीक मानला जातो.

### इतिहासाची पार्श्वभूमी

भारतामधील आयुध निर्माणींचा इतिहास ब्रिटीश काळापासून सुरू होतो. भारतातील पहिली आयुध निर्माणी १८०१ मध्ये गन कॅरेज फॅक्टरी जबलपूर येथे स्थापन करण्यात आली. त्यानंतर देशभरात अनेक आयुध कारखाने उभारले गेले. स्वातंत्र्यानंतर भारताने संरक्षण क्षेत्रात स्वावलंबी होण्याचे ध्येय ठेवले. त्यामुळे आयुध निर्माणींचे जाळे अधिक बळकट करण्यात आले. या कारखान्यांमधून भारतीय सैन्यदलांसाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रे, दारुगोळा, रणगाडे, सैनिकी वाहने आणि इतर साहित्य तयार केले जाऊ लागले.





### आयुध निर्माणींचे महत्त्व

भारतीय सैन्यदलांमध्ये इंडियन आर्मी, इंडियन नेव्ही आणि इंडियन एअर फोर्स यांना आवश्यक असलेले विविध प्रकारचे साहित्य आयुध निर्माणींमधून पुरवले जाते.
या कारखान्यांमध्ये तयार होणाऱ्या वस्तूंमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो. विविध प्रकारची बंदुके व तोफा, दारूगोळा आणि स्फोटके, रणगाडे आणि सैनिकी वाहने,
सैनिकांचे कपडे व सुरक्षात्मक साहित्य, लष्करी उपकरणे आणि तांत्रिक साधने, यामुळे देशाच्या संरक्षण व्यवस्थेला मोठी मदत होते.

### स्वदेशी उत्पादन आणि आत्मनिर्भरता

भारतातील आयुध निर्माणींचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे संरक्षण क्षेत्रात स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देणे. यामुळे परदेशी शस्त्रांवरील अवलंबित्व कमी होते आणि देशाच्या संरक्षण क्षमतेत वाढ होते. आज भारत 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांद्वारे संरक्षण क्षेत्रात स्वावलंबन साधण्याचा प्रयत्न करत आहे. आयुध निर्माणी या उद्दिष्टपूर्तीत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

### साजरा करण्याची पद्धत

आयुध निर्माणी दिनानिमित्त देशभरातील आयुध कारखान्यांमध्ये विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यामध्ये पुढील उपक्रमांचा समावेश असतो. शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, कर्मचारी सन्मान सोहळे, सांस्कृतिक कार्यक्रम, तांत्रिक प्रगतीचे प्रदर्शन. या दिवशी नागरिकांना आयुध कारखान्यांच्या कार्याची माहिती दिली जाते.

### राष्ट्रीय सुरक्षेत योगदान

भारताच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या सैनिकांना आवश्यक असलेली साधने उपलब्ध करून देण्यात आयुध निर्माणींचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. युद्धकाळ असो किंवा शांततेचा काळ, सैन्यदलांना सतत आवश्यक असलेला दारुगोळा आणि साहित्य पुरवण्याची जबाबदारी या कारखान्यांवर असते. आयुध निर्माणी दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून देशाच्या संरक्षण व्यवस्थेतील स्वावलंबन, तांत्रिक प्रगती आणि राष्ट्रसेवेची जाणीव करून देणारा दिवस आहे. आयुध निर्माणींच्या माध्यमातून भारताने संरक्षण क्षेत्रात मजबूत पाया निर्माण केला आहे. या दिवसाच्या निमित्ताने देशाच्या सुरक्षेसाठी कार्य करणाऱ्या सर्व शास्त्रज्ञ, अभियंते आणि कर्मचाऱ्यांच्या कार्याला सलाम करणे हीच खरी देशभक्ती ठरेल.

# आई- वडील शेतमजूर, पत्र्याचे घर...!

## जालन्याच्या भिकन रोजेकरने युपीएससी परीक्षा कशी उत्तीर्ण केली?





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

युपीएससी २०२५ परीक्षेचा निकाल ६ मार्च रोजी लागला. त्यात भिकन रोजेकर यांना ८१२ वी रँक मिळाली आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत भिकन यांनी इथपर्यंतचा प्रवास केला आहे. भिकन यांचे वडील सालगडी म्हणून काम करायचे, तर आई शेतजमुरी करायची.

भिकन सांगतात, " माझे वडील माझ्या जन्माच्या अगोदरच खानदेशात गेले होते. तिथे ते सालदारकी करायचे. त्यांचे आयुष्य दुसऱ्याच्या येथे सालदारकी आणि मोलमजुरीत गेले." मुलाने परीक्षा पास केली, याचा भिकन यांचे वडील जगन रोजेकर यांना अत्यंत आनंद झाला. " माझे आयुष्य गेले सालदारकीत. सालदारकी केली. कामे-धंदे केले लोकांचे. भडगाव तालुक्यात १५- १६ वर्षं काम केले. त्याच्यानंतर येथे आलो. " मुलगा पास झाला, त्याचा आनंद खूप झाला आहे. आपण इमानदारीने काम केले, तशी तू पुढे लोकांची सेवा चांगली कर हे म्हणणे आहे आपले."

**२०२१ पासून युपीएससीची तयारी**

भिकन यांचे दहावी पर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमात झाले. ११- १२वीचे शिक्षण विज्ञान शाखेत घेतल्यानंतर त्यांनी बी. एससी इन अग्रीकल्चरमध्ये पदवी पूर्ण केली आणि मग युपीएससीची तयारी सुरू केली. भिकन सांगतात, "२०२१ पासून मी पूर्णपणे युपीएससीची तयारी सुरू केली. २०२२ ला मी दिल्लीला गेलो. २०२३ ला मला महाराष्ट्र शासनाची बार्टीची स्कॉलरशिप भेटली. त्याद्वारे मला चांगले क्लासेस भेटले. २०२४ ला आणि २०२५ ला मेन्स लिहिली. २०२५ ला मी युपीएससी सिव्हिलची मेन्स, युपीएससी फॉरेस्टची मेन्स आणि युपीएससी सीएपीएफ अस्टिटंड कमांडंट याच्याही मुलाखतीसाठी पात्र झालो होतो. अशा तिन्ही क्लास वन पोस्टसाठी मी लास्टच्या स्टेजपर्यंत पोहचलो."
बार्टी म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था. ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था आहे. या संस्थेद्वारे अनुसूचित जातीच्या तरुणांसाठी युपीएससी परीक्षेच्या तयारीसाठी पूर्व-प्रशिक्षण दिले जाते.
बार्टीच्या स्कॉलरशिपविषयी भिकन पुढे सांगतात, " बार्टीची स्कॉलरशिप म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने महाराष्ट्र शासनाने राबवलेला एक उपक्रम आहे. त्याच्यात ग्रामीण आणि शहरी भागातील जे गरजू विद्यार्थी आहेत, कॅटेगिरीमधले आहेत किंवा महाज्योतीचे ओबीसी, सारथीचे जनरल, त्या पोरांना दिल्लीला पाठवले जाते. त्यांना बेस्ट ऑफ द बेस्ट कोचिंग फॅसिलिटी अव्हेलेबल करुन दिली जाते. " सगळा खर्च सरकार घेते आणि प्रत्येक महिन्याला १३ हजार रुपये स्टायपेंड मिळतो. त्यानंतर, तुम्ही पूर्व परीक्षा पास झालात तर तुम्हाला सिव्हिलसाठी ५० हजार, फॉरेस्टसाठी ५० हजार आणि मुलाखतीपर्यंत पोहचले तर २५ हजार रुपये भेटतात. एवढे सगळे महाराष्ट्र शासन आपल्यासाठी करते."

**युपीएससीच्या यशाचे गमक काय?**

युपीएससी परीक्षेत यशस्वी होण्यासाठी मायक्रो प्लॅनिंग महत्त्वाचे असल्याचे भिकन सांगतात. ते सांगतात, युपीएससी अनेक वर्षांपासून परीक्षा घेत आहे. त्यांच्या प्रश्नांचा एक पॅटर्न आहे. तर आपण १० वर्षांच्या प्रश्न पत्रिका काढायच्या. त्याचा पॅटर्न समजून घ्यायचा. त्याची एक प्रॉपर थीम समजून घ्यायची. प्रॉपर सिलॅबस पूर्ण करुन मॉक टेस्ट देऊन, प्रश्नपत्रिका सोडवून मग आपण पेपर दिला पाहिजे." "मुख्य परीक्षेचा प्रॉपर सिलॅबस आहे, तो लिहून दिलेला आहे. खूप डिटेल लिहून दिलेला आहे. आपण सिलॅबस पूर्ण केला पाहिजे. डाटा, फॅक्ट्स आपल्या उत्तरांमध्ये दिसले पाहिजेत. भाषेवर कमांड असली पाहिजे. कारण भाषेचे निबंधात महत्त्व आहे. ऑप्शनल थोडा डीप पाहिजे. त्याच्यानंतर यूपीएससीने जे- जे प्रश्न विचारले आहेत, मागच्या वर्षी, त्याच्या मागच्या वर्षी त्याचे डिटेल सोल्यूशन आपण तयार केले पाहिजे,"

**'प्लॅन-बी आवश्यक'**

"स्पर्धा परीक्षा या अनप्रेडिक्टेबल असतात. म्हणजे स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासक्रमात कधी कोणता बदल होईल, हे स्पष्टपणे सांगता येत नाही. त्यामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांनी प्लॅन-बी हमेशा रेडी ठेवायला पाहिजे," असे भिकन यांचे मत आहे. भिकन सांगतात, " प्लॅन बी स्पर्धा परीक्षांमध्ये असलाच पाहिजे. कारण की सांगता येत नाही, की पुढे चालून कोणते पेपर समाविष्ट होतील, कोणते पेपर रद्द होतील. ऑप्शनल राहिले की नाही, सिलॅबस दरवर्षी चेंज होत जातो. त्यामुळे एक इनसिक्युरिटी (असुरक्षितता) राहते. त्यामुळे पदवीचे शिक्षण चांगले असले पाहिजे. नसले जरी चांगले तरी कोणतातरी एक प्लॅन-बी असलाच पाहिजे. " जसे माझे घरचे, माझे भाऊ म्हणायचे एक प्रोफेशनल डीग्री घे जेणेकरुन तुला कुठे ना कुठे जॉब लागून जाईल, तर मी ॲग्रीकल्चर केले. तर माझा तो प्लॅन बी होता ॲग्रीकल्चरमध्ये."
दरवर्षी देशभरातील लाखो तरुण स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. त्यातील काही जणांचेच क्लासवन अधिकारी बनण्याचे स्वप्न पूर्ण होते. भिकनसारख्या ग्रामीण भागातील आणि त्यातही हलाखीच्या परिस्थितीतील तरुणांचे युपीएससी परीक्षेतील यश हे अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते. भिकन सांगतात, " घरचे म्हणायचे तू जर गावाकडे आला तर एक नकारात्मक उदाहरण सेट होईल. लोक म्हणतील ४- ५ वर्षं तिकडे राहिला, खूप हुशार होता. हा पास नाही झाला तर आपण तर होऊच शकणार नाही. त्यामुळे तू असा येऊच नको, पास होऊनच ये आणि तसेच झाले."

# भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रतिभावान अभिनेता : शशी कपूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जन्मदिन विशेष

भारतीय चित्रपटसृष्टीत आपल्या देखण्या व्यक्तिमत्त्वाने, सहज अभिनयाने आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय चित्रपटांना ओळख मिळवून देणाऱ्या कलाकारांमध्ये शशी कपूर यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळात त्यांनी अनेक संस्मरणीय भूमिका साकारल्या. अभिनेता, निर्माता आणि रंगभूमीचे प्रेमी म्हणून त्यांनी भारतीय कलाक्षेत्राला मोठे योगदान दिले. त्यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या कार्याचा आणि जीवनप्रवासाचा आढावा घेणे म्हणजे एका समृद्ध कलावंताला अभिवादन करण्यासारखे आहे.

### बालपण आणि कुटुंब पार्श्वभूमी

शशी कपूर यांचा जन्म १८ मार्च १९३८ रोजी झाला. ते भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध पृथ्वीराज कपूर यांचे धाकटे पुत्र होते. त्यांच्या कुटुंबाने भारतीय चित्रपटसृष्टीत मोठे योगदान दिले आहे. त्यांचे मोठे भाऊ राज कपूर आणि शम्मी कपूर हेही प्रसिद्ध अभिनेते होते. लहानपणापासूनच शशी कपूर यांना अभिनयाची आवड होती. त्यांनी वडिलांच्या 'पृथ्वी थिएटर' या नाट्यसंस्थेमध्ये काम करत अभिनयाचे धडे घेतले. त्यामुळे रंगभूमीवरूनच त्यांच्या कलात्मक प्रवासाची सुरूवात झाली.

### चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकीर्द

शशी कपूर यांनी बालकलाकार म्हणून काही चित्रपटांमध्ये काम केले. पुढे १९६० च्या दशकात त्यांनी मुख्य अभिनेता म्हणून हिंदी चित्रपटांमध्ये प्रवेश केला. त्यांचा पहिला प्रमुख चित्रपट 'धर्मपुत्र' होता. यानंतर त्यांनी अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. त्यातील काही चित्रपट आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. त्यात
जब जब फुल खिले, दीवार, कभी-कभी, त्रिशूल, नमक हलाल, त्यांची आणि अमिताभ बच्चन यांची जोडी विशेष लोकप्रिय ठरली. 'दीवार' या चित्रपटातील त्यांचा 'मेरे पास माँ है' हा संवाद आजही भारतीय चित्रपट इतिहासातील एक प्रसिद्ध संवाद मानला जातो.

### आंतरराष्ट्रीय चित्रपटांमध्ये काम

शशी कपूर यांनी केवळ हिंदी चित्रपटांपुरते स्वतःला मर्यादित ठेवले नाही. त्यांनी अनेक इंग्रजी चित्रपटांमध्येही काम केले. ब्रिटीश आणि आंतरराष्ट्रीय चित्रपटांमधील त्यांच्या कामामुळे भारतीय कलाकारांना जागतिक स्तरावर ओळख मिळाली. त्यांच्या आंतरराष्ट्रीय चित्रपटांमध्ये दी हाऊसहोल्डर, शेक्सपिअर वलाह आणि हीट ॲण्ड डस्ट यांचा विशेष उल्लेख करता येईल.

### निर्माते म्हणून योगदान


शशी कपूर यांनी अभिनेता म्हणून यश मिळवल्यानंतर निर्मिती क्षेत्रातही पाऊल ठेवले. त्यांनी आशयघन आणि कलात्मक चित्रपटांची निर्मिती केली. त्यांनी निर्माण केलेल्या चित्रपटांमध्ये जुनून, कलियुग, ३६ चौरंगी लेन, विजेता यांचा समावेश होतो. हे चित्रपट कलात्मक आणि आशयपूर्ण म्हणून ओळखले जातात.

### रंगभूमीवरील प्रेम

चित्रपटांबरोबरच शशी कपूर यांना रंगभूमीची विशेष आवड होती. त्यांनी आपल्या पत्नी जेनीफर केंदाल यांच्या सहकार्याने मुंबईमध्ये पृथ्वी थिएटर पुन्हा सुरू केले. आजही हे रंगमंच भारतीय नाट्यजगतातील एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते.

### पुरस्कार आणि सन्मान

भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानासाठी शशी कपूर यांना अनेक सन्मान प्राप्त झाले. त्यामध्ये भारत सरकारचा प्रतिष्ठित दादासाहेब फाळके ॲवार्ड हा सर्वोच्च सिने पुरस्कार विशेष उल्लेखनीय आहे. तसेच त्यांना पद्मभूषण या नागरी सन्मानानेही गौरविण्यात आले. शशी कपूर हे केवळ एक यशस्वी अभिनेता नव्हते, तर ते भारतीय चित्रपटसृष्टीचे जागतिक प्रतिनिधी होते. अभिनय, निर्मिती आणि रंगभूमी यांद्वारे त्यांनी भारतीय संस्कृती आणि कलांना मोठे योगदान दिले. त्यांचा जन्मदिन हा त्यांच्या समृद्ध कलाविश्वाची आठवण करून देणारा आणि नव्या पिढीला प्रेरणा देणारा दिवस आहे. **त्यांच्या कार्याला आणि स्मृतीला दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे आदरांजली.**



# जन्मतारखेचे रहस्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जीवनाचा दुसरा स्तंभ म्हणजे अंक. बऱ्याच जणांना आपली जन्मतारीख माहिती नसते. माहिती असली तरी चुकीची टाकली जाते. या बाबींचा जीवनाच्या चढ-उतारामध्ये फरक जाणवतो. जन्मतारीखमधील लकी अंक ५,६,७ आहे त्यांनी जास्त काळजी करत बसू नये. जन्मतारीख मधील १,२ अंक मेहनत करायला लावतो. शून्य अपेक्षेपेक्षा जास्त देतो. वेदांमध्ये अंकशास्त्रास फार महत्त्व दिले आहे. गोरा रंग अंकांचा दोष कमी करतो. आई-वडील यांना मान दिला तर जन्मतारीखमधील अंकांचा दोष जातो. शिव रुद्र, शिवलीलामृत, सप्तशती इत्यादी अंकांचा दोष घालवतात. जन्मतारीख dd-mm-yy या स्वरूपातच लागू पडते. जन्मतारखेचे जाणून घ्या रहस्य, चेहऱ्यावर खुलेल आपले हास्य.

**ॐ पंचमहाभुताय नमः**

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# 'या' दिवशी वर्षातील शेवटची अमावास्या

## पितरांचे तर्पण, पवित्र नद्यांमध्ये स्नान, गरजूंना दान केल्याने मिळेल अक्षय पुण्यप्राप्ती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात प्रत्येक महिन्याच्या अमावास्येला विशेष स्थान दिले गेले आहे, परंतु चैत्र महिन्यातील अमावास्येचे महत्त्व काही वेगळेच असते. हिंदू कॅलेंडरनुसार चैत्र अमावास्या २०२६ ही विक्रम संवत वर्षातील शेवटची अमावस्या मानली जाते. या दिवशी पितरांचे तर्पण, पवित्र नद्यांमध्ये स्नान आणि गरजू व्यक्तींना दान धर्म केल्याने अक्षय पुण्याची प्राप्ती होते अशी धार्मिक धारणा आहे. यंदा ही अमावास्या १८ मार्च २०२६ रोजी साजरी केली जाणार आहे. या तिथीला धार्मिक कार्यासाठी अत्यंत पवित्र मानले जाते कारण यानंतर नवीन हिंदू वर्षाची सुरुवात होते.

पंचांगानुसार, अमावास्येची तिथी १७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०७ वाजून १२ मिनिटांनी प्रारंभ होईल. ही तिथी दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ०५ वाजून ३५ मिनिटांनी समाप्त होणार आहे. उदयतिथीच्या नियमांनुसार अमावास्येचे सर्व मुख्य धार्मिक विधी, व्रत आणि



उपवास बुधवार, १८ मार्च २०२६ रोजीच केले जातील. या दिवशी सकाळी लवकर उठून गंगा, यमुना किंवा इतर कोणत्याही पवित्र नदीमध्ये स्नान करणे अत्यंत फलदायी ठरते. जर नदीवर जाणे शक्य नसेल, तर घरीच अंघोळीच्या पाण्यात थोडे गंगाजल मिसळून स्नान करावे, ज्यामुळे पवित्र स्नानाचे पुण्य लाभते.

धार्मिक मान्यतेनुसार चैत्र अमावास्या २०२६ च्या दिवशी पितृदोषापासून मुक्ती मिळवण्यासाठी विशेष प्रार्थना केली जाते. आपल्या पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीसाठी या दिवशी तर्पण आणि श्राद्ध विधी करणे अत्यंत शुभ मानले जाते. या दिवशी भगवान विष्णूची मनोभावे आराधना केल्याने जीवनातील सर्व अडथळे आणि संकटे दूर होतात. स्नानानंतर अन्न, तीळ, वस्त्र किंवा यथाशक्ती धन दान केल्याने पितरांचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो. ज्या व्यक्तींच्या कुंडलीत पितृदोष आहे, त्यांच्यासाठी हे विधी करणे अत्यंत फलदायी मानले जाते.

या पवित्र दिवशी सूर्योदयाच्या वेळी सूर्याला अर्घ्य दिल्याने आरोग्यामध्ये सुधारणा होते आणि मनाला प्रसन्नता मिळते. चैत्र अमावास्या २०२६ ही केवळ एक तिथी नसून आध्यात्मिक प्रगतीसाठीची एक मोठी संधी आहे. या दिवशी दिलेले दान आपल्या कर्मांमधील दोष दूर करते आणि कुटुंबामध्ये सुख, शांती अन् समृद्धी कायम राखण्यास मदत करते, असे शास्त्रोक्त वचन आहे.

# श्रीराम नवरात्र व चैत्र नवरात्रास उद्या प्रारंभ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र शुद्ध १ अर्थात गुरुवार, १९ मार्च २०२६ रोजी गुढीपाडव्यापासून मराठी नवीन वर्षाचा प्रारंभ होतो. हा दिवस वर्षातील चार मुख्य मुहूर्तांपैकी एक असल्याने या दिवशी नवीन कार्यास शुभारंभ करतात. याच दिवशी श्रीराम नवरात्र व चैत्र नवरात्रास प्रारंभ होतो. म्हणून चैत्र नवरात्रापासून श्रीराम नवमीपर्यंत सर्वांनी 'श्रीरामरक्षा' पठण करावे. चैत्र नवरात्रीपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत कुटुंबातील महिलांनी कुलस्वामिनीची सेवा म्हणून श्री दुर्गा सप्तशतीची १४/२१ पारायणे करावीत.

### चैत्र शुद्ध प्रतिपदेस

**'ब्रह्मध्वजारोहण' करतात, म्हणजेच गुढी उभारतात.**

**कृती :** सूर्योदयापूर्वी एक चांगली वेळूची काठी घेऊन त्यास तेल लावून गरम पाण्याने स्नान घालावे. या काठीस हळदी-कुंकवाचे पट्टे ओढावेत. नंतर त्याच्या निमुळत्या टोकावर केशरी रंगाचे वस्त्र घडी करून ठेवून त्याच्यासमवेत कडुनिंबाचा पाला, चाफ्याच्या फुलांची माळ, साखरेचे कंकण, गाठीची माळ या गोष्टी एक सूत्राने पया बांधून त्यावर कलशसदृश एखादे पात्र उपडे झाकावे. ही गुढी आपल्या गृहप्रवेशासमोर (जवळ) उभी करावी व ती पक्की बांधावी. गुढीच्या खाली नैवेद्यासाठी



पाट ठेवावा, रांगोळी काढावी, दाराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधावे. पुढील ध्यानमंत्र गुढी उभारण्याआधी म्हणावा.

**'ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभिष्ट फलप्रदे । प्राप्तेऽस्मिन्संवत्सरे नित्यं मद्गृहे मंगलं कुरू।।'**

**अर्थ :** ब्रह्माचे प्रतीक असलेल्या या ध्वजास माझा नमस्कार असो. सर्व प्रकारचे फल मला मिळू दे. या वर्षामध्ये माझ्या घरामध्ये नित्य मंगल व्हावे, ही प्रार्थना. हा मंत्र म्हणून झाल्यानंतर-

**'ॐ ब्रह्मध्वजाय नमः।'**

या मंत्राने गुढीची पंचोपचार पूजा श्री स्वामी समर्थ सेवा मासिकात दिल्याप्रमाणे करावी. पूजा झाल्यावर गुढी घराबाहेर उभारावी. घरातील पूजा झाल्यानंतर नवीन पंचांगावरील 'श्री गणेशाचे पूजन' करावे. पंचांगात प्रारंभी दिलेले संवत्सर फल वाचावे. दुपारी सर्व शेतकरी सेवेकऱ्यांनी आपल्या शेतात मध्यभागी खड्डा करून त्यात सीतामातेचा नैवेद्य अर्पण करावा.

चैत्र पाडव्याच्या दिवशी सर्व सेवेकऱ्यांनी वडाच्या झाडाची ३ इंच लांबीची मुळी आणावी. ही मुळी व रंगारी हिरडा या दोन्ही वस्तू कुटुंब प्रमुखाने आपल्या उजव्या हातात घेऊन सामुदायिकपणे एक माळ 'श्री स्वामी समर्थ' जप करावा. नंतर त्या वस्तू पाटावर ठेवून त्यांची पंचोपचार पूजा करावी व त्या सर्व वस्तू एका लाल पिशवीत भरून आपल्या घराच्या प्रवेशद्वाराच्या चौकटीच्या खिळ्यास ती टांगावी. या उपायामुळे घरातील सर्व व्यक्तींचे आजार, बाधा व संकटे यापासून संरक्षण होते. या दिवशी कडुनिंबाचा पाला, फुले, हिंग, जिरे, मिरे, ओवा, गूळ यांचे मिश्रण करून घ्यावे व ते मिश्रण घरातील सर्वांना द्यावे. कडुनिंब हे अमृतापासून उत्पन्न झालेले असल्याने ते जंतुनाशक, आरोग्यदायी आहे. त्याचे सेवन आता प्रतिकात्मक मानले जात असले, तरी त्याचे नित्य अनाशापोटी सेवन केल्यास शरीर सुदृढ, निरोगी राहते, अनेक रोगांवर त्याचा उपयोग होतो. सर्व शुभकार्याचा मंगल मुहूर्त पाडवाच होय. म्हणून या दिवशी कोणत्याही नवीन कार्याचा शुभारंभ करावा. फक्त विवाह व उपनयन (मुंज) यास हा मुहूर्त नाही.

## चैत्र पौर्णिमेपर्यंत करता येणार श्रीरामरक्षा पठण, श्री दुर्गा सप्तशतीची पारायणे

# चैत्र नवरात्रि का महत्व क्या है?

## भाग-२

**दुर्गा पूजन से पहले गणेश पूजन -**

हाथ में पुष्प लेकर गणपति का ध्यान करें।और श्लोकपढें -
गजाननम्भूतगणादिसेवितं कपित्थ जम्बूफलचारुभक्षणम्। उमासुतं शोक विनाशकारकं नमामिविघ्नेश्वरपादपंकजम्।
आवाहनः हाथ में अक्षत लेकर
आगच्छ देव देवेश, गौरीपुत्र विनायक।
तवपूजा करोमद्य, अत्रतिष्ठ परमेश्वर॥
ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः इहागच्छ इह तिष्ठकहकर अक्षत गणेश जी पर चढ़ा दें।
हाथ में फूल लेकर-ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः आसनं समर्पयामि।
अर्घा में जल लेकर बोलें -ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः अर्घ्यं समर्पयामि।
आचमनीय-स्नानीयं-ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः आचमनीयं समर्पयामि।
वस्त्र लेकर-ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः वस्त्रं समर्पयामि।
यज्ञोपवीत-ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः यज्ञोपवीतं समर्पयामि ।
पुनराचमनीयम्-ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः ।
रक्त चंदन लगाएं: इदम रक्त चंदनम् लेपनम् ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः ।
श्रीखंड चंदन बोलकर श्रीखंड चंदन लगाएं।

**सिन्दूर चढ़ाएं-**

"इदं सिन्दूराभरणं लेपनम् ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः।
दूर्वा और विल्बपत्र भी गणेश जी को चढ़ाएं।
पूजन के बाद गणेश जी को प्रसाद अर्पित करें:
ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः इदं नानाविधिनैवेद्यानि समर्पयामि।
मिष्ठान अर्पित करने के लिए मंत्र बोलें
शर्करा खण्ड खाद्यानि दधि क्षीर घृतानि च।
आहारो भक्ष्य भोज्यं गृह्यतां गणनायक।
प्रसाद अर्पित करने के बाद आचमन करायें- इदं आचमनीयं ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः।

**इसके बाद पान सुपारी चढ़ायें-**

ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः ताम्बूलं समर्पयामि ।

**अब फल लेकर गणपति पर चढ़ाएं-**

ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः फलं समर्पयामि।
ॐ श्री सिद्धि विनायकाय नमः द्रव्य समर्पयामि।
अब विषम संख्या में दीपक जलाकर निराजन करेंऔर भगवान की आरती गायें।
हाथ में फूल लेकर गणेश जी को अर्पित करें, फिर तीन प्रदक्षिणा करें।

**दुर्गा पूजन**

सबसे पहले माता दुर्गा का ध्यान करें
सर्व मंगल मागंल्ये शिवे सर्वार्थ साधिके।
शरण्येत्रयम्बिके गौरी नारायणी नमोस्तुते ॥

**आवाहन-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। दुर्गादेवीमावाहयामि॥

**आसन-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। आसानार्थेपुष्पाणि समर्पयामि।

**अर्घ्य-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। हस्तयोः अर्घ्यंसमर्पयामि॥

**आचमन-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। आचमनं समर्पयामि॥

**स्नान-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। स्नानार्थं जलंसमर्पयामि॥

**स्नानांग आचमन-**

स्नानान्ते पुनराचमनीयं जलं समर्पयामि।

**पंचामृत स्नान-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। पंचामृतस्नानंसमर्पयामि॥

**गन्धोदक-स्नान-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। गन्धोदकस्नानंसमर्पयामि॥

**शुद्धोदक स्नान-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। शुद्धोदकस्नानंसमर्पयामि॥



आचमन- शुद्धोदकस्नानान्ते आचमनीयं जलं समर्पयामि।

**वस्त्र-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। वस्त्रं समर्पयामि ॥वस्त्रान्ते आचमनीयं जलं समर्पयामि।

**सौभाग्य सूत्र-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। सौभाग्य सूत्रंसमर्पयामि ॥

**चन्दन-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। चन्दनं समर्पयामि॥

**हरिद्राचूर्ण-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। हरिद्रां समर्पयामि॥

**कुंकुम-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। कुंकुम समर्पयामि॥

**सिन्दूर-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। सिन्दूरं समर्पयामि॥

**कज्जल-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। कज्जलं समर्पयामि।

**आभूषण-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। आभूषणानिसमर्पयामि ॥

**पुष्पमाला-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। पुष्पमाला समर्पयामि ॥

**धूप-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। धूपमाघ्रापयामि॥

**दीप-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। दीपं दर्शयामि॥

**नैवेद्य-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। नैवेद्यं निवेदयामि॥नैवेद्यान्ते त्रिबारं आचमनीय जलं समर्पयामि।

**फल-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। फलानि समर्पयामि॥
ताम्बूल-
श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। ताम्बूलं समर्पयामि॥

**दक्षिणा-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। द्रव्यदक्षिणां समर्पयामि॥

**आरती-**

श्रीजगदम्बायै दुर्गादेव्यै नमः। आरार्तिकंसमर्पयामि॥

**प्रदक्षिणा**

"यानि कानि च पापानी जन्मान्तर कृतानि च।
तानी सर्वानि नश्यन्तु प्रदक्षिणपदे पदे॥
प्रदक्षिणा समर्पयामि।"
प्रदक्षिणा करें (अगर स्थान न हो तो आसन पर खड़े-खड़े ही स्थान पर घूमे)

**क्षमा प्रार्थना**

न मंत्रं नोयंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो
न चाह्वानं ध्यानं तदपि च न जाने स्तुतिकथाः ।
न जाने मुद्रास्ते तदपि च न जाने विलपनं
परं जाने मातस्त्वदनुसरणं क्लेशहरणम् ॥
विधेरज्ञानेन द्रविणविरहेणालसतया
विधेयाशक्यत्वात्तव चरणयोर्या च्युतिरभूत् ।
तदेतत्क्षतव्यं जननि सकलोद्धारिणि शिवे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥
पृथिव्यां पुत्रास्ते जननि बहवः सन्ति सरलाः
परं तेषां मध्ये विरलतरलोऽहं तव सुतः ।
मदीयोऽयंत्यागः समुचितमिदं नो तव शिवे
कुपुत्रो जायेत् क्वचिदपि कुमाता न भवति ॥
जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता
न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया ।
तथापित्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे
कुपुत्रो जायेत क्वचिदप कुमाता न भवति ॥
परित्यक्तादेवा विविधविधिसेवाकुलतया
मया पंचाशीतेरधिकमपनीते तु वयसि ।
इदानीं चेन्मातस्तव कृपा नापि भविता
निरालम्बो लम्बोदर जननि कं यामि शरण् ॥
श्वपाको जल्पाको भवति मधुपाकोपमगिरा
निरातंको रंको विहरति चिरं कोटिकनकैः ।
तवापर्णे कर्णे विशति मनुवर्णे फलमिदं
जनः को जानीते जननि जपनीयं जपविधौ ॥
चिताभस्मालेपो गरलमशनं दिक्पटधरो
जटाधारी कण्ठे भुजगपतहारी पशुपतिः ।
कपाली भूतेशो भजति जगदीशैकपदवीं
भवानि त्वत्पाणिग्रहणपरिपाटीफलमिदम् ॥
न मोक्षस्याकांक्षा भवविभव वांछापिचनमे
न विज्ञानापेक्षा शशिमुखि सुखेच्छापि न पुनः ।
अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै
मृडाणी रुद्राणी शिवशिव भवानीति जपतः ॥
नाराधितासि विधिना विविधोपचारैः
किं रूक्षचिंतन परैर्नकृतं वचोभिः ।
श्यामे त्वमेव यदि किंचन मय्यनाथे
धत्से कृपामुचितमम्ब परं तवैव ॥
आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं
करोमि दुर्गे करुणार्णवेशि ।
नैतच्छठत्वं मम भावयेथाः
क्षुधातृषार्ता जननीं स्मरन्ति ॥
जगदंब विचित्रमत्र किं परिपूर्ण करुणास्ति चिन्मयि ।
अपराधपरंपरावृतं नहि मातासमुपेक्षते सुतम् ॥
मत्समः पातकी नास्तिपापघ्नी त्वत्समा नहि।
वं ज्ञात्वा महादेवियथायोग्यं तथा कुरु ॥

इसके बाद थाली में दीपक पुष्प सजाकर माँ की आरती करें

**दुर्गा जी की आरती (१)**

जगजननी जय! जय! माँ! जगजननी जय! जय!
भयहारिणी, भवतारिणी, भवभामिनि जय जय।
तू ही सत-चित-सुखमय, शुद्ध ब्रह्मरूपा।
सत्य सनातन, सुन्दर, पर-शिव सुर-भूपा॥
आदि अनादि, अनामय, अविचल, अविनाशी।
अमल, अनन्त, अगोचर, अज आनन्दराशी॥
अविकारी, अघहारी, अकल कलाधारी।
कर्ता विधि, भर्ता हरि, हर संहारकारी॥
तू विधिवधू, रमा, तू उमा महामाया।
मूल प्रकृति, विद्या तू, तू जननी जाया॥
राम, कृष्ण तू, सीता, ब्रजरानी राधा।
तू वाँछाकल्पद्रुम, हारिणि सब बाघा॥
दश विद्या, नव दुर्गा नाना शस्त्रकरा।
अष्टमातृका, योगिनि, नव-नव रूप धरा॥
तू परधामनिवासिनि, महाविलासिनि तू।
तू ही श्मशानविहारिणि, ताण्डवलासिनि तू॥
सुर-मुनि मोहिनि सौम्या, तू शोभाधारा।
विवसन विकट सरुपा, प्रलयमयी, धारा॥
तू ही स्नेहसुधामयी, तू अति गरलमना।
रत्नविभूषित तू ही, तू ही अस्थि तना॥
मूलाधार निवासिनि, इह-पर सिद्धिप्रदे।
कालातीता काली, कमला तू वरदे॥
शक्ति शक्तिधर तू ही, नित्य अभेदमयी।
भेद प्रदर्शिनि वाणी विमले! वेदत्रयी॥
हम अति दीन दुःखी माँ! विपत जाल घेरे।
हैं कपूत अति कपटी, पर बालक तेरे॥
निज स्वभाववश जननी! दयादृष्टि कीजै।
करुणा कर करुणामयी! चरण शरण दीजै॥

**दुर्गा जी की आरती (२)**

जय अम्बे गौरी मैया जय श्यामा गौरी ।
तुमको निशदिन ध्यावत हरि ब्रह्मा शिवरी ।।
मांग सिन्दूर विराजत टीको मृग मद को ।
उच्चवल से दोऊ नैना चन्द्र बदन नीको।
कनक समान कलेवर रक्ताम्बर राजै।
रक्त पुष्प गलमाला कंठन पर साजै।।
केहरि वाहन राजत खडग खप्पर थारी
सुर नर मुनि जन सेवत तिनके दुःख हारी।।
कानन कुण्डली शोभित नाशाग्रे मोती ।।
कोटिक चन्द्र दिवाकर राजत सम ज्योति।
शुम्भ निशुम्भ विदारे महिषासुर घाती ।
घूम्र विलोचन नैना निशिदिन मदमाती ।
चौंसठ योगिन गावन नृत्य करत भैरूं ।
बाजत ताल मृदंगा अरू बाजत डमरू।।
भुजा चार अति शोभित खडग खप्पर धारी ।
मन वांछित फल पावत सेवत नर नारी ।।
कंचन थाल विराजत अगर कपूर बाती ।
श्री मालकेतु में राजत कोटि रत्न ज्योति।।
श्री अम्बे की आरती जो कोई नर गावै।
कहत शिवानन्द स्वामी, सुख सम्पति पावै।।

(क्रमशः)

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)